# कर्जाची परतफेड करून आपली पत राखा

आर्थिक साक्षरता सप्ताह
5 ते 9 जून 2017

### विचारपूर्वक कर्ज काढा

आपल्या परतफेडीच्या क्षमतेप्रमाणे विचारपूर्वक कर्ज काढा आणि उत्पन्न निर्माण करणाऱ्या मालमत्तेत गुंतवणूक करा. चांगल्या कर्जाची उदाहरणे:

- घर विकत घेण्याकरिता तारण कर्ज
- मुलांच्या उच्च शिक्षणाकरिता शैक्षणिक कर्ज. विद्यालक्ष्मी पोर्टल वर ऑनलाइन अर्ज करा (https://www.vidyalakshmi.co.in)
- सूक्ष्म आणि लहान उद्योगाकरिता कर्ज घेऊन आपले व्यवसायाचे स्वप्न पूर्ण करा. या साठी उद्यमीमित्र पोर्टल तपासा (https://udyamimitra.in)



### तुम्ही कर्ज काढल्या नंतर

- परतफेडीचा एकही हप्ता चुकवू नका
- परतफेडीस विलंब आपला क्रेडिट इतिहास / क्रेडिट स्कोअर वर विपरित प्रभाव करतो
- विलंब होणार असल्यास आपल्या बँकेला नेहमी कळवा
- मुदतीपूर्वी कर्जाची परतफेड केल्यास आपली पत सुधारते

### क्रेडिट स्कोअर

आपला क्रेडिट इतिहास आणि इतर संबंधित घटकांच्या आधारे, आपणास क्रेडिट स्कोअर दिला जातो. जेवढा आपला जास्त स्कोअर तेवढी आपली अधिक पत आणि तेवढीच आपणास कर्ज मिळण्याची जास्त संधी




### मोफत क्रेडिट अहवाल

जर आपण पूर्वी कर्ज घेतले असेल तर वर्षातून एकदा पुढील चारपैकी कोणत्याही एका क्रेडिट माहिती कंपनी मार्फत मोफत क्रेडिट अहवाल मिळवा (जानेवारी – डिसेंबर) उदा. 1. क्रेडिट इन्फर्मेशन ब्युरो (इंडिया) लिमिटेड 2. एक्विफॅक्स क्रेडिट इन्फर्मेशन सर्विसेस प्रा. लिमिटेड, 3. एक्स्पेरियन क्रेडिट इन्फर्मेशन कंपनी ऑफ इंडिया प्रा. लिमिटेड आणि 4. सीआरआयएफ हाय मार्क क्रेडिट इन्फर्मेशन सर्विसेस प्रा. लिमिटेड

आर्थिक साक्षरता • समृद्धीचा मार्ग
ECD
वित्तीय समावेशन आणि विकास विभाग
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in